**मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, यवतमाळ**
**जिल्हा परिषद,यवतमाळ**

क्रं./जिग्रावियं/वि.अ.सां/ 1189 /२०२४

# प्रेसनोट

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी**
**यवतमाळ**

**विषय:- केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ बाबत.**

**संदर्भ:- १)संचालक,राज्य व्यवस्थापन कक्ष यांचे पत्र क्र/राव्यक्र-ग्रागृ/आय.टी/२५५४/दिनांक २७.१२.२०२४**

संचालक राज्य व्यवस्थापन कक्ष,ग्रामीण गृह निर्माण महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भीय पत्रानुसार महाराष्ट्र राज्याला सन २०२४-२५ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत वाढीव १३,६६,७६७ घरकुले मंजूर होणार असल्याने जिल्ह्यात ग्राम पंचायतीच्या "ड" यादीनुसार घरकुलाचे लक्षांक प्राप्त होणार आहे. त्यानुषंगाने ग्राम पंचायत स्तरावर लाभार्थी कडून बँक पासबुक प्रत,आधार कार्ड,नमुना नं-८ व जॉब कार्ड ग्राम पंचायत अधिकारी,रोजगार सेवक व ग्रामीण गृह निर्माण अभियंता यांचे मार्फत जमा करण्यात येत आहेत.

जमा करण्यात येणा-या कागदपत्राचे आधारे ग्राम पंचायतीच्या प्रतीक्षा यादीतील शिल्लक लाभार्थींची नोंदणी करावयाची असल्याने लाभार्थींनी वरील नमूद कागदपत्रे आपले ग्राम पंचायतींना सादर करावी.

कागदपत्रे जमा केली म्हणजे घरकुल मंजूर झाले असे समजण्यात येऊ नये हि केवळ लाभार्थींची नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे.जेव्हा शासनामार्फत जिल्ह्याला लक्षांक प्राप्त होईल तेव्हा तात्काळ पात्र लाभार्थींची घरकुले मंजूर करण्यास मदत होईल त्याकरिता "ड" यादीतील लाभार्थींनी आपले कागदपत्रे ग्राम पंचायत मध्ये जमा करण्याचे याद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रेस नोट स्थानिक वृत्तपत्रात व्यापक प्रसिद्धी द्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Signed by
Patki Mandar Jayantrao
Date: 02-01-2025 12:26:23
(मंदार पत्की,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,यवतमाळ